# मी 'एनी मस्कारेन' बोलतेय!



मी आहे एनी मस्कारेन.

लोक मला म्हणायचे – माझी वाणी परखड, कृती निर्भीड आणि स्वभाव आक्रमक. पण मला आक्रमक बनवलं ते अन्यायानं. अन्याय दिसला की माझ्या रक्तातच आग पेटायची.

संविधानसभेत एकदा निवडणुकांवर चर्चा सुरू होती. तेव्हा मी ठामपणे सांगितले – "आपण पुढील निवडणुकांसाठी नियम करत नाही आहोत; आपण राष्ट्राच्या भविष्यासाठी पाया घालत आहोत. म्हणून सोयीस्कर काय यापेक्षा नैतिक काय याचा विचार झाला पाहिजे."

माझ्यासाठी राजकारण म्हणजे नैतिक जबाबदारी आहे.

माझा जन्म ६ जून १९०२ रोजी त्रिवेंद्रम येथे झाला. आम्ही लॅटिन कॅथलिक ख्रिस्ती समाजातील, मागास समजल्या जाणाऱ्या समुदायातून होतो. घरची आर्थिक परिस्थिती कठीण होती; पण शिक्षणाची जिद्द होती. मी महाराजा कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि इतिहास व अर्थशास्त्र या विषयांत पदव्युत्तर पदव्या मिळवल्या.

त्या काळी त्रावणकोर सरकार महिलांना नोकरी देत नव्हते. त्यामुळे मी सिलोन (आजचे श्रीलंका) येथे जाऊन प्राध्यापिका झाले. दरम्यान त्रावणकोरचा कारभार सेतू लक्ष्मी बायी यांच्या हाती आला. त्यांनी महिलांसाठी कायद्याचे शिक्षण खुले केले. मी परत आले, कायद्याची पदवी घेतली आणि प्राध्यापिका म्हणून कार्य करू लागले.

परंतु केवळ नोकरी करून समाधान नव्हते. त्रावणकोरमध्ये मतदानाचा अधिकार फक्त श्रीमंत आणि जमीनदार लोकांपुरता मर्यादित होता. सामान्य जनतेला तो अधिकार नव्हता. हे मला मान्य नव्हते. मी ऑल त्रावणकोर जॉइंट पॉलिटिकल काँग्रेसमध्ये सहभागी झाले आणि पुढे त्रावणकोर स्टेट काँग्रेसच्या संस्थापक नेत्यांपैकी एक झाले. आमचे ध्येय स्पष्ट होते – सार्वत्रिक प्रौढ मताधिकार आणि जबाबदार

सरकार.

दिवाण आणि राजसत्ता आमच्या विरोधात उभी राहिली. माझ्या घरावर हल्ले झाले, मारहाण झाली, दागिने लुटले गेले. एकदा तर पोलिसाने माझ्यावर मोटारसायकल चालवली. तरीही मी मागे हटले नाही. उलट सभांमधून आणि निदर्शनांतून अधिक ठामपणे आवाज उठवला. अखेर माझ्यावर राजद्रोहाचा खटला भरला गेला आणि मला तुरुंगवास भोगावा लागला.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या काळात मी पुन्हा अटक झाले आणि दोन वर्षांची शिक्षा झाली. तुरुंगात असतानाही चळवळीचे कार्य सुरूच ठेवले.

मी महात्मा गांधी यांच्या आश्रमातही काही काळ राहिले. त्यांनी एकदा मला पत्र लिहून सांगितले की माझ्या बोलण्यात संयम हवा. परंतु मला माहीत होते की सत्य कधी कधी कठोर असते.

ब्रिटिशांनी स्वातंत्र्य जाहीर केल्यानंतर त्रावणकोर स्वतंत्र राहण्याचा विचार करत होता. जनतेच्या तीव्र आंदोलनामुळे अखेरीस त्रावणकोर भारतात विलीन झाले आणि सार्वत्रिक मताधिकार मान्य करण्यात आला. आमचा संघर्ष यशस्वी झाला.

मी नव्या विधिमंडळावर निवडून आले आणि पुढे भारताच्या संविधानसभेची सदस्य झाले. विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. मजबूत केंद्र शासनाच्या बाजूने मी ठाम भूमिका मांडली.

१९५२ मध्ये मी पहिल्या लोकसभेवर निवडून गेले आणि स्वतंत्र भारतातील पहिल्या महिला खासदारांपैकी एक झाले. संसदेत प्रतिबंधात्मक अटकेच्या कायद्याला मी ठाम विरोध केला, कारण व्यक्तिस्वातंत्र्य माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते.

माझे संपूर्ण आयुष्य भीती न बाळगता सत्य बोलण्यासाठी, अन्यायाविरुद्ध उभे राहण्यासाठी आणि राजकारणाला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी समर्पित होते. राजकारण म्हणजे केवळ सत्तेचा खेळ नाही; ते मूल्यांचे, नैतिकतेचे आणि जनतेच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे.